---------------------------------------------------------------------------------------------------------------

लॉक-डाउन आणि लॉक-अप दोन्हीमध्ये फक्त एकच फरक आहे...

.

.

लॉकअपमध्ये आत येऊन मारतात....

.

आणि...

.

लॉकडाउनमध्ये बाहेर पडणाऱ्याला हाणतात....

---------------------------------------------------------------------------------------------------------------

बायको - अहो, आपल्या लग्नाचा २५वा वाढदिवस जवळ येतोय. तुम्ही फॉरेन टूरचं म्हणाला होतात... लक्षात आहे ना?

नवरा - हो हो... म्हणजे काय? आपण जाणारोत की आफ्रिकन सफारीला...

बायको - अय्या खरंच... आणि लग्नाच्या ५०व्या वाढदिवशी.......?

.

.

नवरा - तेव्हा मी तुला तिथून परत आणेन...

---------------------------------------------------------------------------------------------------------------

``मुलांनो, ऑनलाइन वर्गांना तुम्ही छान प्रतिसाद देताय, खूप मन लावून अभ्यास करताय, आनंद घेताय. मजा येतेय ना?``

``होssssss!``

``वा, मलासुद्धा मजा येतेय खूप. कंटाळा नाही ना आलेला?``

``नाहीssss!``

``मी काय सांगतेय, ते समजतंय ना?``

``होssss``

``सांगा बघू, आज काय काय समजलं तुम्हाला?``

``तुमच्या घरची चहा पावडर संपलेय, टोस्टर बिघडला आहे, घराच्या भिंतीला रंग द्यायला झाला आहे आणि आज सकाळी काकांनी केलेल्या पोळ्या करपल्या होत्या!``

---------------------------------------------------------------------------------------------------------------